# विद्यापीठाच्या ऑनलाईन परीक्षा गुरुवारपासून

कोल्हापूर, ता. ११ : शिवाजी विद्यापीठाच्या विविध अभ्यासक्रमांच्या परीक्षेत ऑनलाइनचा पर्याय निवडलेल्या विद्यार्थ्यांच्या परीक्षेस गुरुवार (ता. १५)पासून प्रारंभ होत आहे. त्याबाबतची माहिती विद्यापीठाच्या परीक्षा विभागाने पत्रकाद्वारे प्रसिद्धीस दिली.

परीक्षा विभागाने ६ ते १५ एप्रिल दरम्यान होणाऱ्या अभ्यासक्रमांच्या परीक्षा स्थगित केल्या होत्या. मात्र, त्यात सुधारणा करून पुन्हा परीक्षांचे वेळापत्रक बदलले आहे. ज्या विद्यार्थ्यांनी ऑनलाईनचा पर्याय निवडला आहे, त्यांच्या परीक्षा गुरुवारपासून, तर ऑफलाईनचा पर्याय निवडलेल्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा कोरोनाचा प्रादुर्भाव कमी झाल्यावर होणार आहेत. परीक्षा विभागाने पुन्हा सुधारित वेळापत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध केले आहे, त्याची नोंद घ्यावी, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे यांनी केले.

# महात्मा फुले यांना अभिवादन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात महात्मा जोतिराव फुले यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या स्मृतींना रविवारी अभिवादन केले. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय भवनामध्ये कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते महात्मा फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला. यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी महात्मा फुले यांच्या प्रतिमेस पुष्प वाहून अभिवादन केले. यावेळी परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक जी. आर. पळसे, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. एस. एस. महाजन, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, इंग्रजी अधिविभागाच्या प्रमुख डॉ. तृप्ती करेकट्टी, डॉ. ए. एम. सरवदे, दीपक भादले, डॉ. उपरे आदी उपस्थित होते.

# विद्यापीठाच्या गुरुवारपासून फक्त ऑनलाईन परीक्षा

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने १५ एप्रिलपासून सुरू होणाऱ्या ८७ विषयांच्या केवळ ऑनलाईन परीक्षा घेण्यात येणार आहेत. विद्यापीठ कार्यक्षेत्रातून ९८ हजार ३०० विद्यार्थी परीक्षा देणार आहेत.

विद्यापीठ परीक्षा विभागाकडून ३२४ विविध अभ्यासक्रमांच्या परीक्षा २२ मार्चपासून सुरू झाल्या आहेत. मात्र, राज्य सरकारच्या 'ब्रेक द चेन' धोरणानुसार ६ ते १२ एप्रिलपर्यंतच्या काही अभ्यासक्रमाच्या परीक्षा यापूर्वीच पुढे पान ४ वर ▶

# विद्यापीठाच्या गुरुवारपासून फक्त ऑनलाईन परीक्षा

## ऑफलाईनच्या १७ हजार विद्यार्थ्यांच्या परीक्षा लांबणीवर

विद्यापीठ हिवाळी सत्र परीक्षा सुरू आहेत. कोरोनामुळे विद्यार्थ्यांना ऑफलाईन टू ऑनलाईन पर्याय निवडण्याची १० एप्रिलपर्यंत मुभा देण्यात आली होती. परंतु अद्यापही १७ हजारहून अधिक विद्यार्थी ऑफलाईन परीक्षा देण्यावर ठाम आहेत. अशा विद्यार्थ्यांची परीक्षा लांबणीवर पडल्याने जीव टांगणीला लागला आहे.

(पान १ वरून) ढकलल्या आहेत. १५ एप्रिलपासूनच्या परीक्षेसाठी विद्यापीठ अधिविभाग, महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना ऑफलाईन टू ऑनलाईन पर्याय निवडण्याचा पर्याय दिला होता. दरम्यान, कोरोनाचा वाढता संसर्ग पाहता परीक्षा विभागाने रविवारी नवीन सुधारित परिपत्रक काढले आहे. यापूर्वी घोषित केलेल्या वेळापत्रकाप्रमाणे १५ एप्रिलपासून फक्त ऑनलाईन पद्धतीने पर्याय निवडलेल्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा सुरू होणार आहेत. यात बीए, बीकॉम, बीएस्सी, एमए, एमकॉम, एमएस्सी, बीबीए, बीसीए, बीसीएस अभ्यासक्रमांचा समावेश आहे.

ऑफलाईन पर्याय निवडलेल्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा इतक्यातच सुरू होणार नाहीत. ऑफलाईन पद्धतीने परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांच्या परीक्षेचे वेळापत्रक कोरोना प्रादुर्भाव कमी झाल्यावर स्वतंत्रपणे घोषित करण्यात येणार आहे. ६ ते १२ एप्रिल या कालावधीतील कोरोना प्रादुर्भावाच्या कारणास्तव स्थगित केलेल्या परीक्षांचे सुधारित वेळापत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आले आहे. ऑनलाईन पद्धतीने परीक्षा पर्याय निवडलेल्या विद्यार्थ्यांचीच फक्त परीक्षा घेतली जाणार आहे. क्लस्टर पद्धतीने घेण्यात येणाऱ्या अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, आर्किटेक्चर, विधी, व्यवस्थापन या अभ्यासक्रमाच्या परीक्षा नियोजित वेळापत्रकाप्रमाणे ऑनलाईन पद्धतीने होतील, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक जी. आर. पळसे यांनी दिली.

# महात्मा फुले यांना शिवाजी विद्यापीठात अभिवादन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठात महात्मा फुले यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या स्मृतींना अभिवादन करण्यात आले.

विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय भवनामध्ये कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी महात्मा फुले यांच्या प्रतिमेस पुष्प वाहून अभिवादन केले. याप्रसंगी परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक जी. आर. पळसे, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. एस. एस. महाजन, डॉ. आर. व्ही. गुरव आदी उपस्थित होते.

# शहर परिसरात महात्मा फुले यांना अभिवादन

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ११ : स्त्री शिक्षणाचे प्रणेते, थोर समाजसुधारक महात्मा जोतिराव फुले यांच्या जयंतीनिमित्त शहर आणि परिसरात विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. कोरोना प्रतिबंधक नियम पाळत मान्यवरांच्या हस्ते प्रतिमापूजन केले, तसेच महात्मा फुलेंच्या पुतळ्याला अभिवादन करण्यात आले.

### आंबेडकर जयंती समितीतर्फे महात्मा फुलेंना अभिवादन

कोल्हापूर : महात्मा फुले यांच्या बिंदू चौक येथील पुतळ्यास कोल्हापूर जिल्हा डॉ. बाबासाहेब आंबेडकर मध्यवर्ती जयंती समितीतर्फे प्रा. शहाजी कांबळे, प्रा. डॉ. शरद गायकवाड, आरपीयआयचे (आठवले गट) जिल्हाध्यक्ष उत्तम कांबळे आदींच्या हस्ते अभिवादन करण्यात आले. प्रा. डॉ. गायकवाड म्हणाले, "महात्मा फुले यांनी सामाजिक सुधारणांचा पाया घातला. शैक्षणिक, सामाजिक, धार्मिक क्षेत्रात आमूलाग्र क्रांती घडवून आणली." रुपाली वायदंडे, दिगंबर लोहार, सुनील कोल्हटकर, आर. के. कांबळे, बाळासाहेब भोसले, टी. एस. कांबळे यांनी मनोगत व्यक्त केले. प्रा. कांबळे यांनी भीम जयंतीचे नियोजन शासनाने कोरोनाच्या पार्श्वभूमीवर करणे आवश्यक आहे. १४ एप्रिल रोजी शासनाने योग्य ते नियोजन करावे, असे सांगितले. 'लोजपा'चे बाळासाहेब भोसले, डी. जी. भास्कर, सदानंद डिगे, बाजीराव नाईक आदींनी अभिवादन केले. यावेळी अनिल धनवडे, प्रवीण आजरेकर, नीलेश बनसोडे, पांडुरंग कुरुकलीकर आदी उपस्थित होते.



कोल्हापूर : कोल्हापूर जिल्हा डॉ. बाबासाहेब आंबेडकर मध्यवर्ती जयंती समितीतर्फे महात्मा फुले यांना अभिवादन करताना उपस्थित मान्यवर.



कोल्हापूर : बिंदू चौक येथील महात्मा फुले यांच्या पुतळ्यास अभिवादन करताना जिल्हाधिकारी दौलत देसाई, निलोफर आजरेकर, अपर पोलिस अधीक्षक तिरुपती काकडे, पोलिस उपअधीक्षक मंगेश चव्हाण, जुना राजवाडा पोलिस ठाण्याचे निरीक्षक प्रमोद जाधव आदी.

### परिवर्तन फाउंडेशन

कोल्हापूर : परिवर्तन फाउंडेशन, सर्वधर्मीय जयंती समिती आणि विविध पक्ष, संघटनांतर्फे बिंदू चौक येथील महात्मा फुले यांच्या पुतळ्यास जिल्हाधिकारी दौलत देसाई, निलोफर आजरेकर, अपर पोलिस अधीक्षक तिरुपती काकडे, पोलिस उपअधीक्षक मंगेश चव्हाण, जुना राजवाडा पोलिस ठाण्याचे निरीक्षक प्रमोद जाधव यांनी पुष्पहार अर्पण केला. यावेळी फाउंडेशनचे अध्यक्ष अमोल कुरणे, सर्वधर्मीय जयंती समितीचे युनिस पटवेगार, शिवशाही फाउंडेशनचे सुनील सामंत, जयकुमार शिंदे, राज कुरणे, रवी कोल्हटकर, मुबारक अत्तार आदी उपस्थित होते.

### शिवाजी विद्यापीठ

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आज महात्मा जोतिराव फुले यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या स्मृतींना अभिवादन करण्यात आले. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय भवनात कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते महात्मा जोतिराव फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनीही महात्मा फुले यांच्या प्रतिमेस पुष्प वाहून अभिवादन केले. यावेळी जी. आर. पळसे, डॉ. एस. एस. महाजन, डॉ. आर. व्ही. गुरव, डॉ. तृप्ती करेकट्टी, डॉ. ए. एम. सरवदे, दीपक भादले, डॉ. उपरे आदी उपस्थित होते.



कोल्हापूर : महात्मा जोतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त महापालिकेतर्फे प्रतिमेस डॉ. कादंबरी बलकवडे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण केला.




कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात महात्मा फुले जयंतीनिमित्त अभिवादनप्रसंगी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, डॉ. तृप्ती करेकट्टी, डॉ. एस. एस. महाजन आदी.

### भटका व विमुक्त समाज विकास मंडळ

कोल्हापूर : गुलामगिरीविरुद्ध बंड करणारे अन् थोर समाजसुधारक क्रांतिबा जोतिराव फुले यांची जयंती भटका व विमुक्त समाज विकास मंडळातर्फे साजरी करण्यात आली. कार्याध्यक्ष व्यंकाप्पा भोसले यांनी प्रतिमेस पुष्प वाहून अभिवादन केले. यावेळी शिवाजी कोरवी, सुनील भोसले, के. पी. पाटील, संजय पाटील, सुधीर भोसले, शिल्पा भोसले, देवेंद्र भोसले, दक्षराज भोसले, स्मृती भोसले, प्रगुन भोसले आदी उपस्थित होते.

### 'भीम फेस्टिव्हल'चे उद्‍घाटन

कोल्हापूर : काल कथित माजी खासदार एस. के. डिगे मेमोरियल फाउंडेशनतर्फे भीम फेस्टिव्हलचे उद्‍घाटन झाले. यावेळी माजी महापौर निलोफर आजरेकर, फाउंडेशनचे अध्यक्ष सदानंद डिगे, विकी माजगावकर, बाळासाहेब भोसले, प्रशांत चुयेकर आदी उपस्थित होते. दरम्यान, बिंदू चौक येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा महू (मध्य प्रदेश) येथे ज्या घरात जन्म झाला, त्या घराची वंदनीय भव्य प्रतिकृती उभारली आहे. दरवर्षी फाउंडेशनतर्फे ११ ते १४ एप्रिलपर्यंत भीम फेस्टिव्हलचे आयोजन केले जाते. बिंदू चौकात यासाठी सजावट केली जाते. यावेळी जिल्हाधिकारी दौलत देसाई, पोलिस अधिकारी तिरुपती काकडे, शहर पोलिस उपअधीक्षक मंगेश चव्हाण यांनी भेट दिली. त्यांनी महापुरुषांना अभिवादन केले. महात्मा फुले यांच्या जयंतीनिमित्त महात्मा फुले यांच्या पुतळ्यास आणि डॉ. आंबेडकर यांच्या पुतळ्यास माजी महापौर आजरेकर यांनी अभिवादन केले. प्रा. डॉ. अक्षता गावडे यांचे 'भारतीय संविधान व आजची स्थिती' यावर ऑनलाईन व्याख्यान झाले. 'चला जाणून घेऊया संविधान' यावर ग्रँड मास्टर अनुप्रिया गावडे यांनी संविधानातील कलमांचे महत्त्व सांगितले. धोंडिराम कांबळे यांनी प्रास्ताविक केले.